MHRG080019022023

दाखल दिनांकः २७/१२/२०२३
नोंदणी दिनांकः २७/१२/२०२३
निकाल दिनांकः ०९/०३/२०२६
कालावधी : वर्षे महिने दिवस
०२ ०२ १३

## (भाग ''अ'')

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.२, खालापूर, जि. रायगड यांचे न्यायालयात

## (पिठासीन अधिकारीः दिपाली एस. खोत)

नियमित फौजदारी खटला क्र. २२१/२०२३ निशाणी क्र.४७/ब

गुन्हा क्र. २९७/२०२३

**महाराष्ट्र शासन,**
द्वारा पोलीस निरीक्षक,
खोपोली पोलीस ठाणे,
ता. खालापूर, जि. रायगड. **--अभियोग पक्ष--**

विरुध्द

१. **समीर बाबु वाघमारे,**
वयः २८ वर्षे, व्यवसायः मोलमजुरी,

२. **सुनिल सुरेश वाघमारे,**
वयः ३० वर्षे, व्यवसायः मोलमजुरी,

३. **वामन हिरामण वाघमारे (मयत),**

४. **गोरखनाथ उर्फ रामदास किसन वाघमारे,**
वयः ४५ वर्षे, व्यवसायः मोलमजुरी,
सर्व रा. आडोशी आदीवासीवाडी,
ता. खालापूर, जि. रायगड. **--आरोपी--**

**दोषारोप** : भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे.

---

**विधिज्ञांची नावे** : सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये.
आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. टी. वाडेकर.

---

## (भाग ''ब'')

| | |
|---|---|
| अपराधाचा दिनांक | २८/०९/२०२३ |
| फिर्याद दिनांक | ०१/१०/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २७/११/२०२३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १७/१०/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०२/०४/२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवण्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०९/०३/२०२६ |
| शिक्षा घोषीत केल्याचा दिनांक, असल्यास | -- |

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | अपराधाचे कलम | शिक्षा दिली किंवा निर्दोष मुक्तता | शिक्षेचा तपशील | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये सुट देणेकामी कोठडीतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | समीर बाबु वाघमारे | ०१/१०/२०२३ | ०५/१०/२०२३ | भारतीय दंड विधान संहिता | निर्दोष मुक्त | --- | --- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | सुनिल सुरेश वाघमारे | २६/१०/२०२३ | २७/१०/२०२३ | कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे. | निर्दोष मुक्त | --- | --- |
| ४ | गोरखनाथ उर्फ रामदास किसन वाघमारे | २६/१०/२०२३ | २७/१०/२०२३ | | निर्दोष मुक्त | --- | --- |

## (भाग "क")

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे साक्षीदारांचा तपशील** :-

**अभियोग पक्षाचे साक्षीदार**

| अ. क्र. | साक्षीदारांचे नावे | | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | सागर संजय कदम | पंच | ३९ |
| २. | लक्ष्मीकांत केवटा गौडा | फिर्यादी | ४१ |

**आरोपी पक्षाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | ---- | -- |

**न्यायालयाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | ---- | -- |

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे कागदपत्रांचा तपशील** :-

**अभियोग पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | फिर्याद | ४२ |
| २. | प्रथम खबर अहवाल | ४३ |

**आरोपी पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | ---- | -- |

**न्यायालयाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | ---- | -- |

**मुद्देमालाचा तपशील** :-

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | १५५ मिटर लांबीची पी.व्ही.सी. वायर सोलून त्यातील ताब्याची तार किं.अं. अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- | -- |
| २. | काळया लाल पिवळ्या रंगाचे वायरवरील प्लॅटीकच्या आवरणावरील तुकडे कि.अं.मुल्यहिन. | -- |
| ३. | एक लोखंडी कानडी कोयता त्यास केसरी रंगाची प्लास्टीकची मुठ कि.अं.मुल्यहिन. | -- |
| ४. | एक कुऱ्हाड लाकडी दांडा असलेली कि.अं.मुल्यहिन | -- |

## (न्यायनिर्णय)

(घोषित दिनांक ०९/०३/२०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचा खटला थोडक्यात खालीलप्रमाणे,**

२. फिर्यादी लक्ष्मीकांत केवटा गौडा हे सिनिअर ऑफिसर म्हणून ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. खोपोली या कंपनीत काम करतात. सदर कंपनीचे मुंबई पुणे एक्सप्रेस रोडवर मिसिंग लिंक प्रोजेक्टचे काम चालू आहे. दिनांक २८/०९/२०२३ रोजी सकाळी ८ः०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी कंपनीच्या ऑफिसमध्ये असतांना साईट इंनचार्ज आर.आर.व्यकंटेश यांनी त्यांना फोन करुन सांगितले की, खोपोली बाजूकडील मुंबई पुणे एक्सप्रेस वे रोडवरील मिसिंग लिंक प्रोजेक्टमधील गडर लॉचिंग एरिया या ठिकाणाची 4 Core and 25.0 Sq.mm पी.वही.सी. वायर आणि केबल चोरी झालेली आहे. त्याबाबत खात्री करण्याकरिता फिर्यादी, कमलेश कुलवार (नाईट ऑफिसर) राजीव पाठक (टाईम किपर) असे सदर ठिकाणी जावून पाहणी केली असता, गडर लॉचिंग एरिया या ठिकाणाची 4 Core and 25.0 Sq.mm पी.वही.सी. वायर आणि केबलचे तुकडे पडलेले दिसून आले. त्यावेळी त्यांनी रात्री डयुटीस असणारे कमलेश कुलवार व राजीव पाठक यांना झालेल्या चोरी बाबत विचारले असता, त्यांनी सांगितले की, दिनांक २८/०९/२०२३ रोजी सकाळी ६ः३० वाजण्याच्या सुमारास ते साईटवर गेले होते त्यावेळी पी.व्ही.सी. वायर आणि केबल व्यवस्थित होती. त्यानंतर सदरची चोरी झालेली आहे. त्यावेळी फिर्यादीने तेथे नाईट डयुटी करिता असलेला सेक्युरिटी गार्ड दिपक ओव्हाळ याला चोरी झाली आहे त्यावेळी

तो कोठे होता याबाबत विचारणा केली असता, त्यावेळी तो बोगद्याजवळ राऊंड मारण्यासाठी गेला असल्याचे त्याने फिर्यादीला सांगितले. त्यानंतर फिर्यादीने एकुण रु. ३,१०,०००/– किमतीची एकुण १५५ मिटर लांबीची पी.व्ही.सी. वायर आणि केबल 4 Core and 25.0 Sq.mm ची चोरी झाल्या बाबत दिनांक ०१/१०/२०२३ रोजी खोपोली पोलिस ठाणे येथे अज्ञात चोरट्याविरुध्द तक्रार दिली.

३. सदर फिर्यादीवरुन खोपोली पोलीस ठाणे अंमलदार यांनी आरोपींविरुध्द अपराध क्र. २९७/२०२३ अन्वये भारतीय दंड विधान कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला. सदर गुन्ह्याचा तपास तपासी अंमलदार पोलीस उपनिरिक्षक ए.बी.व्हरांबळे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, जप्ती पंचनामा करुन मुद्देमाल जप्त केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, आरोपींना अटक केली. त्यानंतर त्यांनी खोपोली पोलीस ठाणे अंमलदार यांचे मार्फत भारतीय दंड विधान कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. मी निशाणी क्र.३४ वर भारतीय दंड विधान कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाबाबत आरोपींविरुध्द दोषारोप ठेवला. सदरचा दोषारोप आरोपींनी अमान्य असल्याचे सांगून संपरीक्षेची मागणी केली. त्यानुसार केसचे संपरीक्षण पार पाडण्यात आले. संपरीक्षेदरम्यान आरोपींविरुध्द दोषात्मक पुरावा आढळून न आल्याने फौ.प्र.सं.कलम ३१३(१)(ब) अन्वये आरोपी चे निवदेन नोंदविण्यात आलेले नाही.

५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. मुद्दे व त्यावरील कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे शाबीत केले आहे की, दिनांक २८/०९/२०२३ रोजी पहाटे ०६:३० ते ८:०० वाजण्याचा दरम्यान मौजे खोपोली येथील ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीच्या बाजूकडील, मुंबई पुणे एक्सप्रेस वे रोड लगत मिसिंग लिंकचे काम चालू असलेल्या ठिकाणावरुन आरोपी क्र. १, २ व ४ यांनी संगणमत करुन १५५ मिटर लांबीची पी.व्ही.सी. वायर आणि केबल 4 Core and 25.0 Sq.mm ही फिर्यादीच्या संमतीशिवाय, लबाडीच्या इराद्याने कुऱ्हाड व कोयत्याने कट करुन चोरी करुन नेली व त्यायोगे **भारतीय दंड विधान संहीता कलम ३७९ सह कलम ३४** अन्वये शिक्षेस पात्र अपराध केला ? | नकारार्थी |
| २. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

६. अभियोग पक्षाने आरोपींवर ठेवलेले दोष सिध्द करण्यासाठी दोन साक्षीदार तपासले आहेत.

### मुद्दा क्र. १ करिता

७. भारतीय दंड संहिता कलम ३७९ सह कलम ३४ नुसार अभियोग पक्षाने दिनांक २८/०९/२०२३ रोजी सकाळी ६:३० ते ८:०० वाजण्याच्या दरम्यान मौजे खोपोली ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीच्या बाजूकडील, मुंबई पुणे एक्सप्रेस वे रोड लगत मिसिंग लिंकचे काम चालू असलेल्या ठिकाणावरुन आरोपी क्र. १, २ व ४

यांनी संगणमत करुन १५५ मिटर लांबीची पी.व्ही.सी. वायर आणि केबल 4 Core and 25.0 Sq.mm ही फिर्यादीच्या संमतीशिवाय, लबाडीच्या इराद्याने कुऱ्हाड व कोयत्याने कट करुन चोरी करुन नेली हे सिध्द करणे गरजेचे आहे.

८. लक्ष्मीकांत गौडा (साक्षीदार क्र.२) हे फिर्यादी असून त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, ते निळकंठ व्हॅली येथे त्यांची पत्नी व मुलगी यांच्या सह राहण्यास आहेत. ते मार्च २०१९ पासून ॲपकॉन इन्फ्रास्ट्रक्चर लि. खोपोली या कंपनीत काम करतात. सन २०२३ मध्ये ते या कंपनीमध्ये सिनिअर ऑफिसर पर्सनल ॲड ॲडमिनिस्ट्रेशन या पदावर काम करत होते. त्यावेळी त्यांच्या कंपनीला पुणे मुंबई एक्सप्रेस हायवे रोडवर मिसिंग लिंक प्रोजेक्टचे काम मिळाले होते. घटना दिनांक २८/०९/२०२३ रोजी घडली होती. त्यादिवशी त्यांना सकाळी ८ः०० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या कंपनीचे काम सुरू असलेल्या साईटवरुन कोणाचातरी फोन आला होता व त्यांनी त्यांना फोनवर केबल चोरीला गेली असल्याचे सांगितले. त्यानंतर ते पोलिस स्टेशनमध्ये गेले व केबल चोरीला गेल्या बाबत निशाणी क्र.४३ नूसार तक्रार दिली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांना पोलिसांनी पोलिस स्टेशमध्ये बोलविले होते. त्यावेळी पोलिसांनी त्यांना त्यांचा चोरीला गेलेला माल म्हणजेच १५५ मिटर लांबीची पी.व्ही.सी. वायर आणि केबल परत दिली होती. सदरचा माल सध्या त्यांच्या ताब्यात आहे. त्यांना चोरी कोणी केली होती हे सांगता येणार नाही. त्यांना पोलिसांकडून आरोपींची नावे समजली नव्हती. त्यांना पोलिसांनी आरोपी दाखविले असे काही झाले नव्हते. पोलिसांनी त्यांचा पुरवणी जबाब नोंदविला नव्हता. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामध्ये या साक्षीदाराने हे मान्य केले आहे की, त्यांनी फिर्याद अज्ञात इसमाविरुध्द दिली होती. त्यांनी कोणालाही प्रत्यक्ष चोरी करतांना पाहिलेले नाही. त्यांची व आरोपींची न्यायालया बाहेर तडजोड झालेली आहे. त्यांची आता

आरोपींविरुध्द काहीही तक्रार नाही. त्यांना त्यांचा चोरीला गेलेला माल परत मिळालेला असून तो सध्या त्यांच्या ताब्यात आहे. त्यांना पोलिसांकडून चोरी कोणी केली होती या बाबत काहीही समजले नव्हते. त्यांना आरोपी कोण होते, त्यांची नावे काय होती हे सांगता येणार नाही.

९. साक्षीदार क्र.१ सागर कदम हे पंच असून त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दिनांक ०२/१०/२०२३ रोजी त्यांना खोपोली पोलिसांनी पोलिस स्टेशनमध्ये बोलविले होते. तेथे पोलिसांनी त्यांच्या लिहिलेल्या कागदावर सहया घेतल्या, त्यातील मजकूर त्यांनी वाजला नव्हता. पंचनाम्यावरील सही त्यांची आहे. त्यातील मजकूर त्यांना सांगता येणार नाही. सदर साक्षीदार त्याच्या पोलिसांसमोरील जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारले त्यामध्ये या साक्षीदाराने दिनांक ०२/१०/२०२३ रोजी ते पोलिसांसोबत पंचनाम्यासाठी गेल्याचे व पोलिसांनी त्यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केल्याचे नाकारले आहे.

१०. वरील बाबी व अभिलेखावर उपलब्ध असलेला पुरावा विचारात घेतला असता असे दिसून येते की, या प्रकरणातील फिर्यादी यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपींविरोधात काहीही सांगितलेले नाही. निशाणी क्र.४३ वरील फिर्यादीचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, फिर्यादीने फिर्याद अज्ञात इसमांविरुध्द दिलेली आहे. फिर्यादीने त्यांच्या पुराव्यात चोरी कोणी केली हे सांगता येणार नाही, त्यांना पोलिसांकडून आरोपींची नावे समजली नव्हती, त्यांना पोलिसांनी आरोपी दाखवले असे काही झाले नव्हते असे सांगितले आहे, त्याच प्रमाणे फिर्यादीने चोरीला गेलेला माल त्यांना परत मिळालेला असून तो त्यांच्या ताब्यात असल्याचे मान्य केले आहे.

फिर्यादीने निशाणी क्र.४५ वर त्यांना या केस कामी इतर कोणीही अन्य साक्षीदार तपासायचे नाहीत अशी पुरशिस दिलेली आहे, घटनास्थळ पंच साक्षीदार क्र.१ यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा संशयापलिकडे सिध्द झालेला नाही. जप्ती पंच साक्षीदार क्र.४ व ५ यांना समन्स तसेच जामीनपात्र वॉरंट काढले असता, ते साक्षीसाठी हजर राहिलेले नाहीत. त्यामुळे फिर्यादी यांचा पुरावा लक्षात घेता त्यांची व आरोपींची न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे दिसून येते त्यामुळे फिर्यादी व साक्षीदार हे आरोपींविरोधात साक्ष देत नसावेत असे दिसून येते त्यामुळे अभियोगपक्षाच्या कथनाविषयी संशय निर्माण होतो. त्यामुळे संशयाचा फायदा आरोपींना देवून त्यांना निर्दोषमुक्त करणे उचित होईल. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.२ करिता खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी क्र.१ व २ व ४ यांची भारतीय दंड संहिता कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी क्र.१ व २ व ४ यांनी फौ.प्र.स. ४३७(अ) प्रमाणे पुढील सहा महिने करिता प्रत्येकी रु.१५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

३. जप्त मुद्देमाल १५५ मिटर लांबीची पी.व्ही.सी. वायर सोलून त्यातील ताब्याची तार याचा मुळ फिर्यादी यांना देण्यात आलेला अंतरिम ताबा अपिल कालावधीनंतर कायम करण्यात यावा.

४. जप्त मुद्देमाल काळया लाल पिवळया रंगाचे वायर वरील प्लॅटीकच्या आवरणावरील तुकडे, एक लोखंडी कानडी कोयता, एक कुऱ्हाड लाकडी दांडा असलेली हे मुल्यहिन असल्याने त्याची अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

**(निकाल खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.)**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.03.11 17:23:16 +0530

**( डी. एस. खोत)**

स्थळ – खालापूर.
दिनांक – ०९/०३/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
न्यायालय क्र.२, खालापूर.